मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोरवाडी चौकामध्ये वाहतूक बेट नकोच

## महापालिका प्रशासनाने प्रयोग करू नयेत; वाहतूक पोलिसांनी धाडले पत्र

**पिंपरी | प्रतिनीधी**

शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (मोरवाडी) चौकात रिक्षा आणि अन्य वाहनांचे रस्त्यावरच पार्किंग केले जाते. त्यात सिग्नलची वेळ कमी असल्याने नेहमीच वाहतूक कोंडी होत आहे. अशा परिस्थितीत महापालिकेने चौकातच वाहतूक बेटाचे नियोजन केले आहे. यासाठी ब्लॉक टाकण्यात आले आहेत. त्यामुळे कोंडीत भर पडली आहे. त्यामुळे महापालिकेने हा प्रयोग करू नये, असे पत्र वाहतूक पोलिसांनी दिले आहे. मात्र, यानंतरही महापालिका प्रशासन या प्रयोगावर ठाम आहे.



मोरवाडी चौकातून पिंपरी गाव, चिंचवड, नेहरूनगर, लांडेवाडी, भोसरी, मोशीकडे जाता येते. त्यामुळे या चौकात सतत वर्दळ असते. गेल्या काही दिवसांपासून या चौकात सतत वाहतूक कोंडी होत आहे. येथील दोन-तीन मोठ्या संकुलांमध्ये ग्राहक मोठ्या प्रमाणावर येतात. हे नागरिक मेट्रो मार्गाखालील मोकळ्या जागेत वाहने उभी करतात. संबंधित आस्थापनांसमोरील जागा अपुरी पडत असल्याने बऱ्याच वेळा नागरिक पदपथावरच वाहने पार्किंग उभी करतात. त्यामुळे पादचाऱ्यांचाही खोळंबा होत आहे. त्यात रिक्षांचीही भर पडते. यामुळे वाहनांच्या दूरवर रांगा लागतात.

मोरवाडी चौकातील सिग्नलची वेळ वाढवली असली, तरी वाहतूक कोंडीत काहीही फरक पडलेला नाही. निगडी मार्गाकडील चौकातील रिक्षांमुळे वाहतूक कोंडी होते. शहरी पथ धोरणांतर्गत (अर्बन स्ट्रीट गाइड लाइन्स) पदपथ विकसन आणि मेट्रो स्थानकामुळे रस्ते अरुंद झाले आहेत. त्यात आता महापालिकेने मोरवाडी चौकात वाहतूक बेट उभारण्याचे नियोजन केले आहे. यासाठी सिमेंटचे ब्लॉक टाकले आहेत. त्यामुळे रस्ता अरुंद होऊन सिग्नल सुटल्यानंतरही वाहनांची गती कमी होऊन कोंडी वाढत आहे.

> “ वाहतूक बेटासाठी सध्या टाकलेल्या सिमेंट ब्लॉक्समुळेच वाहतूक कोंडी होत आहे. त्यात आणखी भर पडणार असल्यामुळे वाहतूक बेट उभारू नये, यासाठी आम्ही महापालिकेला पत्र पाठविले आहे.
>
> **- वर्षाराणी पाटील,**
> **वरिष्ठ पोलिस निरीक्षक.**

> “ नागरिकांना एकाच वेळी ६० मीटर रस्ता ओलांडणे शक्य नाही. त्यामुळे वाहनचालकांना थांबण्यासाठी वाहतूक बेट तयार करण्यात येत आहेत. वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढणारच आहे. फक्त वाहनचालकांनाच प्राधान्य द्यायचे का?
>
> **- बापू गायकवाड, सहशहर अभियंता,**
> **महापालिका.**

# वाकड–मामुर्डी दरम्यान सेवा रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्ष सुरूवात

## चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनीधी**

अखेर वाकड ते मामुर्डी दरम्यानच्या सेवा रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या होर्डिंग्ज काढण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू असून, नागरिकांना लवकरच वाहतूक कोंडीच्या त्रासातून मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी काही दिवसांपूर्वी या परिसरात पाहणी दौरा करत संबंधित अधिकाऱ्यांना काम तातडीने सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यांच्या निर्देशानंतरच आज प्रत्यक्ष कामाला गती मिळाली आहे.

कामाची सुरुवात होताच ठिकठिकाणी डांबरीकरण, अतिक्रमण हटविणे, सर्विस लाईन शिफ्ट करणे आणि वाहतूक मार्ग मोकळा करणे अशी कामे हाती घेण्यात आली आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC), वाहतूक विभाग, आणि महावितरण या सर्व यंत्रणांचा यात समन्वय राखला जात आहे.

आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केले की, “या भागातील नागरिकांना गेल्या वर्षभरापासून वाहतूक कोंडीचा मोठा त्रास होत आहे. त्यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून सर्व्हिस रोडची कामे हाती घेतली असून ती नियोजित वेळेत पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.”

दरम्यान, भुजबळ चौक ते भूमकर चौकापर्यंतचे काम मोठ्या प्रमाणात पूर्ण झाले असून, आता उर्वरित सेवा रस्त्यांचे काम जलद गतीने पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

या ठिकाणी वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या होर्डिंग्ज, झाडे, कंटेनर आणि अतिक्रमणे हटविण्याचे कामही सुरू आहे. काम पूर्ण झाल्यानंतर या परिसरातील वाहनचालकांना सुरळीत आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळेल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला आहे.

# दुचाकीसाठी नोंदणी क्रमांकाची नवीन मालिका

## दुचाकी आणि चारचाकी क्रमांकांसाठी वेगवेगळ्या तारखांना अर्ज स्वीकारले जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी ‘एमयु’ ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांक दुचाकीसाठी ठेवण्याबाबत आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी ९ ऑक्टोबर रोजी तर दुचाकी मालिकेतील उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी १० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा.

अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी ‘डी.वाय. आय.टी.ओ., पिंपरी चिंचवड’ यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनूसचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.




चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी १० ऑक्टोबर रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास १० ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधीत अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे.

दुचाकीची यादी १३ ऑक्टोबर रोजी कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. दुचाकीसाठी अर्जदारांना लिलावाकरीता जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास १३ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकारी यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केलेल्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. वाहन क्रमांक आरक्षित केल्याचे संदेश मोबाईलवर आल्यानंतर पाचव्या दिवशी पावती कार्यालयातून मिळणार आहे.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व शुल्क सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नाही. आकर्षक क्रमांकाचे शुल्कामध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे विहीत केलेले शुल्क लागू करण्यात येणार असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# MSDP अंतर्गत महिलांसाठी कृषी, अन्नप्रक्रिया विशेष प्रशिक्षण उत्साहात

## महिला सक्षमीकरणाचा संकल्प: माजी नगरसेवक शांतराम बापू भालेकर यांचा पुढाकार!

**पिंपरी | प्रतिनीधी**

भारतीय उद्यमिता विकास संस्था (EDII), अ‍ॅक्सेंचर आणि महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या संयुक्त विद्यमाने मायक्रो स्किलप्रेन्योरशिप डेव्हलपमेंट प्रोग्राम (MSDP) अंतर्गत कृषी, बाजारपेठ व अन्नप्रक्रिया उत्पादनांवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम रुपी नगर, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडला. हा कार्यक्रम ३ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला.



प्रशिक्षणाचा समारोप ७ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला. या वेळी माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर, EDII चे मॅनेजर भगवान हरकळ, माविमच्या एरिया को-ऑर्डिनेटर ज्योती हेलवे, तसेच मास्टर ट्रेनर अमृता गोडसे यांच्या उपस्थितीत सहभागी महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांना स्वावलंबन, उद्यमशीलता व स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीकडे प्रवृत्त करणे असा होता. प्रशिक्षणामध्ये व्यवसाय नियोजन, वित्तीय व्यवस्थापन, विपणन कौशल्य, गुणवत्ता नियंत्रण, तसेच आधुनिक अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानाचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणादरम्यान महिलांनी विविध उद्योजकीय कल्पना मांडल्या असून, स्वतःची उत्पादने बाजारात आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अखेरीस मान्यवरांनी सहभागी महिलांचे विशेष कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल उद्योजकीय प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

> “ महिलांना उद्यमशीलतेच्या प्रवासात सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. अशा प्रशिक्षणांमुळे त्या आत्मविश्वासाने पुढे येतात, आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात आणि समाजाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलतात."अशा प्रकारचे प्रशिक्षण महिलांच्या आत्मविश्वासात भर घालतात, त्यांचे जीवनमान उंचावतात व समाजात त्यांचा सक्रीय सहभाग वाढवतात." तसेच त्यांनी शासकीय योजनांचा लाभ घेणे, स्थानिक संसाधनांचा वापर व विपणनाच्या संधींचा योग्य वापर करावा.
>
> **- शांताराम बापू भालेकर, माजी नगरसेवक.**



# पुणे महापालिका निवडणुकीसाठी पाच हजार केंद्रांची आवश्यकता

## मतदारयादीचा घोळ टाळण्यासाठी 'सॉफ्टवेअर'चा उपयोग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी पाच हजार मतदान केंद्रांची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यक त्या जागांची पाहणी करण्यास महापालिका प्रशासनाने सुरुवात केली आहे. तसेच, मतदारयादीचा घोळ टाळण्यासाठी 'सॉफ्टवेअर'चा उपयोग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी ही माहिती पत्रकारांशी बोलताना दिली.

राज्य निवडणूक आयोगाने पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचनेला मान्यता दिली आहे. या प्रभागरचनेनुसार मतदारयादीची विभागणी करणे, मतदान केंद्रांची निश्चिती करणे ही कामे केली जाणार आहेत. यासाठी महापालिका अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी निवडणूक विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेतली. यामध्ये बूथनिहाय कामांच्या नियोजनाविषयी चर्चा झाली. मतदान केंद्रासंदर्भातील जबाबदारी महापालिकेचे उपायुक्त अरविंद माळी यांच्याकडे देण्यात आली आहे

गेल्या वर्षी शहरात विधानसभा निवडणूक झाली होती, त्यावेळी किती आणि कोणती मतदान केंद्रे होती. आणखी किती ठिकाणी नवीन मतदान केंद्रे करता येईल. आगामी महापालिका निवडणुकीसाठी साधारणपणे पाच हजार केंद्रांची आवश्यकता असल्याची चर्चा या बैठकीत झाली. तसेच, या मतदान केंद्रांसाठी जागा मिळवणे यासाठीची आवश्यक ती तयारी करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. प्रभाग रचना अंतिम झाल्याने मतदारयादीची विभागणी करावी लागणार आहे.

'प्रभागनिहाय याद्यांसाठी 'सॉफ्टवेअर'चा वापर केला जाणार आहे. या कामासाठी पूर्वी मनुष्यबळाचा उपयोग केला जात होता. मात्र, आता 'सॉफ्टवेअर'चा उपयोग केल्याने घोळ टाळता येणार आहे,' असे अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी सांगितले. 'अनेकदा एकाच कुटुंबातील मतदारांची नावे ही वेगवेगळ्या प्रभागांमध्ये येतात. तर, काहींची नावे दुसऱ्या मतदार केंद्रांमध्ये येतात. काही वेळा कुटुंबांतील सदस्यांची नावे वगळली जाण्याचे प्रकार घडतात. हे घोळ टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने विशेष काळजी घेण्यात येणार आहे,' असेही अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सांगितले.

दरम्यान, पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीची अंतिम प्रभागरचना निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आली आहे. महापालिकेने तयार केलेल्या प्रारुप प्रभागरचनेवर मोठ्या प्रमाणात हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. नागरिकांनी तसेच राजकीय पदाधिकाऱ्यांनी नोंदविलेल्या हरकती, सूचनांचा विचार करुन काही प्रभागांमध्ये किरकोळ बदल केले असून आठ प्रभागांच्या नावांमध्ये बदल केला आहे. यंदा पहिल्यांदाच अशा पद्धतीने १२ प्रभागांमध्ये बदल करण्यात आले आहेत. तर आठ प्रभागांच्या नावांमध्ये देखील बदल करण्यात आला आहे.




### नवीन केंद्रांची निर्मिती करण्याचे निर्देश

» महापालिका प्रशासनाने निवडणूकपूर्व तयारीसाठी मतदार केंद्रांची पाहणी, जागा निश्चिती आणि डेटा तपासणीचे काम पुढील काही दिवसांत सुरू करण्याची तयारी केली आहे.मतदान केंद्रांच्या कामकाजाची जबाबदारी उपायुक्त अरविंद माळी यांच्याकडे देण्यात आली आहे. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीतील मतदान केंद्रांचा तपशील तपासून, आवश्यक ठिकाणी नवीन केंद्रांची निर्मिती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### मतदारयादीसाठी सॉफ्टवेअर

»पूर्वी मतदार याद्यांचे विभाजन हे महापालिकेचे कर्मचारी करत होते. त्यामुळे त्यात त्रुटी राहून मतदार यादीत घोळ होत होता. अनेकदा एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या प्रभागांतील केंद्रांवर जातात किंवा काही नावे वगळली जातात. त्यातून मतदानाची टक्केवारी घसरते. हे प्रकार टाळण्यासाठी यावेळी सॉफ्टवेअरचा वापर करून मतदार याद्यांची विभागणी केली जाणार आहे. मतदार याद्या अचूक असाव्यात यावर आमचा भर आहे, असे दिवटे सांगितले.

# पुण्यात रात्री दहानंतर फटाके वाजविण्यास बंदी

## रस्त्यावरदररोज पाच जणांवर गुन्हे दाखल करण्याचे दिले आदेश, बेकायदा फ्लेक्सबाजी विरोधात कारवाईचे आदेश देण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील फटाके विक्री स्टॉल आणि फटाके वाजविण्याबाबत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नियमावली जाहीर केली अहे. त्यानुसार रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत फटाके वाजविण्यास बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांचे आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

फटाके वाजविण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने नियमावली आखून दिली आहे. ध्वनी आणि वायू प्रदुषण टाळण्यासाटी नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत फटाके वाजविण्यास बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांच्या नियमांनुसार मोठा आवाज करणारे 'अॅटमबॉम्ब' वाजविणे, बाळगणे, तसेच विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. शहरातील रुग्णालये, तसेच शैक्षणिक संस्था, न्यायालयाच्या १०० मीटर परिसरात शांतता क्षेत्र आहे.

या भागात दिवसा आणा रात्री फटाके वाजविण्यास बंदी घालण्यात आली आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आदेशात म्हटले आहे. फटाके विक्रेत्यांनी नियमावलीचे पालन करणे गरजेचे आहे. पुणे शहर परिसरात २० ते २४ ऑक्टोबर या कालवधीत तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे. महामार्गावर, पुलावर फटाके वाजविणे, अग्निबाण उडविण्यास बंदी घालण्यात आली आहे. फटाक्यांच्या आवाजाची मर्यादा १२५ डेसीबलपेक्षा जास्त नसावी, नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न केल्यास कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.



### नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई

»पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले आहे की, नागरिकांनी या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम तसेच पर्यावरण संरक्षण कायदा अंतर्गत कायदेशीर कारवाई होईल.

### फटाके विक्रेत्यांसाठी नियम

- » पुणे शहरात फटाके विक्रीसाठी 20 ते 24 ऑक्टोबर दरम्यान तात्पुरते परवाने वैध असतील.
- » रस्त्यापासून 10 मीटर अंतरापर्यंत फटाके फोडणे, फेकणे किंवा अग्निबाण उडवणे मनाई आहे.
- » विक्रेत्यांनी ध्वनी मर्यादेचे पालन करणे अनिवार्य आहे.

# आरक्षण निश्चित झाल्याने नगराध्यक्षपदासाठी मोर्चेबांधणी

## जिल्ह्यातील चौदा नगरपरिषदांपैकी चार ठिकाणी आणि चार नगरपंचायतींपैकी तीन ठिकाणच्या नगराध्यक्षपदावर महिलांना संधी

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदासाठीचे आरक्षण निश्चित झाल्याने काही इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. मात्र, आरक्षण लक्षात घेऊन नव्याने मोर्चेबांधणीही सुरू झाली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील चौदा नगरपरिषदांपैकी चार ठिकाणी आणि चार नगरपंचायतींपैकी तीन ठिकाणच्या नगराध्यक्षपदावर महिलांना संधी मिळणार आहे. आठ नगर परिषदांची नगराध्यक्षपदे सर्वांसाठी खुली राहणार आहेत.

राज्यातील २४७ नगर परिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदांसाठीचे आरक्षण सोमवारी निश्चित करण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यातील १४ नगर परिषदा आणि चार नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षणही निश्चित झाले आहे. जिल्हा प्रशासनाकडून यापूर्वीच नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रारूप प्रभागरचनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे.



### आरक्षणानुसार इच्छुकांनी रणनीती

» नगर परिषदा आणि नगरपंचायतींसाठीचे आरक्षण निश्चित झाल्याने जिल्ह्यातील राजकारणाचा पटही बदलला आहे. आरक्षण जाहीर होण्यापूर्वी जिल्ह्यातील इच्छुकांनी नगराध्यक्षपदासाठी तयारी सुरू केली होती. मात्र, आरक्षणात बदल झाल्याने राजकीय समीकरणांतही बदल झाला आहे. अपेक्षित आरक्षण न मिळाल्याने काही इच्छुकांचा हिरमोड झाला आहे, तर नव्या आरक्षणानुसार इच्छुकांनी रणनीती आखण्यासही सुरुवात केली आहे.

### नगर परिषद

» अनुसुचित जाती प्रवर्ग : फुरसुंगी-उरूळी देवाची आणि लोणावळा नगरपरिषद

» नागरिकांचा मागास प्रवर्ग : शिरूर (महिला), जुन्नर (महिला), दौंड (महिला)

» खुला प्रवर्ग : चाकण (महिला), राजगुरूनगर, जेजुरी, आळंदी, बारामती, तळेगाव-दाभाडे, सासवड, भोर आणि इंदापूर

### नगरपंचायत

» अनुसूचित जाती प्रवर्ग : माळेगाव

» नागरिकांचा मागास प्रवर्ग : मंचर (महिला)

» खुला प्रवर्ग राखीव : वडगाव मावळ (महिला)

नव्याने अस्तित्वात आलेल्या फुरसुंगी-उरूळी देवाची, लोणावळा नगर परिषदेचे नगराध्यक्षपद अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. शिरूर, जुन्नर आणि दौंड या तीन नगर परिषदांमधील नगराध्यक्ष पद हे नागरिकांचा मागास प्रवर्गातील (ओबीसी) महिलांसाठी राखीव झाले आहे. चाकण नगरपरिषद खुल्या प्रवर्गातील महिला नगराध्यक्षाची निवड करण्यात येणार आहे. राजगुरूनगर, जेजुरी, आळंदी, बारामती, सासवड, तळेगाव दाभाडे, इंदापूर आणि भोर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी खुल्या प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे

मंचर नगरपंचायतीसाठी ओबीसी प्रवर्गातून महिला नगराध्यक्षाची, वडगाव-मावळ आणि देहू नगरपंचायतीसाठी खुल्या प्रवर्गातून महिला नगराध्यक्ष निवडण्यात येणार आहे. माळेगाव बुद्रुक नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडला जाणार आहे.

दरम्यान, नगरपरिषदांच्या आराखड्यानुसार जिल्ह्यातील बारामती आणि फुरसुंगी या दोन नगर परिषदांमध्ये अनुक्रमे ४१ आणि ३२ इतकी सर्वाधिक सदस्यसंख्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. फुरसुंगी, भोर या नगर परिषदा, तर मंचर आणि माळेगाव या दोन नगरपंचायतींचा गेल्या वेळी झालेल्या निवडणुकीवेळी समावेश नव्हता. या वेळी त्यांच्याही निवडणुका होणार आहेत. तर, फुरसुंगी नगर परिषदेची प्रथमच निवडणूक होणार आहे. नगरपंचायतीमध्ये एक सदस्य प्रभाग पद्धत आहे. बहुतांश नगर परिषदांमध्ये द्विसदस्यीय प्रभाग पद्धती आहे.

# आळंदीतील राजकीय वातावरणात नवचैतन्य, नगराध्यक्ष आरक्षण खुल्या प्रवर्गात

## आळंदी शहरातील राजकीय वातावरणात नवचैतन्य निर्माण झाले असून, इच्छुक उमेदवारांनी जोरदार तयारी सुरु केली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात नगराध्यक्ष पदांच्या आरक्षणाची सोडत जाहीर झाली. या सोडतीत आळंदी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण ओपन (खुल्या प्रवर्गासाठी) घोषित करण्यात आले आहे. या घोषणेनंतर आळंदी शहरातील राजकीय वातावरणात नवचैतन्य निर्माण झाले असून, इच्छुक उमेदवारांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.

दिवाळीनंतर निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आळंदी नगरपरिषदेची शेवटची निवडणूक 10 जानेवारी 2016 रोजी झाली होती. त्या वेळी शिवसेना आणि भाजपामध्ये नगराध्यक्ष पदासाठी अतितटीचा सामना झाला होता. या निवडणुकीत भाजपाच्या वैजयंता उमरगेकर यांनी विजय मिळवला होता.




### अनुभव की नव्यांना संधी

» आगामी निवडणुकीत अनेक नवीन चेहरे तसेच माजी पदाधिकारी आपला दावा सादर करण्याची शक्यता आहे. आता सर्वांचे लक्ष दिवाळीनंतर जाहीर होणाऱ्या निवडणुकीकडे लागले असून, आळंदीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. शहरातील प्रत्येक गटात बैठका, चर्चा, आणि रणनीती आखण्याचे सत्र रंगू लागले आहे.

नगरपरिषदेचा कार्यकाळ 24 जानेवारी 2021 रोजी संपल्यापासून शहरात प्रशासक राज सुरू आहे. प्रशासकांच्या काळात आळंदीतील नागरिकांना अनेक मूलभूत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शहरातील स्वच्छतेचा अभाव, अनियमित पाणीपुरवठा, अतिक्रमण आणि वाहतुकीचा प्रश्न या गंभीर मुद्द्यांवर नागरिकांकडून सातत्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. नगराध्यक्ष नसल्याने शहर विकासाची गाडी रुळावरून उतरल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

याआधी दोन वेळा आरक्षण जाहीर होऊनही निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जानेवारी अखेरपर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर प्रशासनाकडून तयारी गतीने सुरू करण्यात आली आहे. मंत्रालयात झालेल्या सोडतीनुसार, आळंदी नगराध्यक्ष पद खुले (ओपन) असल्याने या पदासाठी महिला आणि पुरुष दोघांनाही संधी उपलब्ध झाली आहे.